**आजचे पंचांग**

रविवार दि. ८ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, पंचमी रात्री ९-१२ पर्यंत, दिवस नक्षत्र– स्वाती दुपारी १-३२ पर्यंत, योग– ध्रुव सकाळी ७-०४ पर्यंत नंतर व्याघात, चंद्र रास- तुला, सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...




आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ८ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### गॅस सिलेंडर ६० रुपयांनी महाग

**चंदीगड** : अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाचे पडसाद आता जगासह भारताच्या बाजारपेठांत उमटताना दिसत आहेत. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी करताच कच्च्या तेलासह एलपीजीचे दर भडकले आहेत. याचा थेट परिणाम भारतात होताना दिसत असून केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या पुरवठ्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे.
सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबविला आहे. यामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्री उद्योग ठप्प होण्याची भीती आहे. तसेच यादरम्यान सर्वसामान्यांच्या खिशाला देखील इराण-इस्रायल संघर्षाची झळ बसली असून घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती ६० रुपयांनी भडकल्या आहेत. यामुळे ८६० रुपयांना मिळणा-या सिलेंडरसाठी महाराष्ट्रात ९२० रुपये मोजावे लागणार आहेत. १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरसाठी नवे दर आजपासून लागू झाले आहेत.

### महाराष्ट्रासह अनेक राज्यांना उष्णतेचा इशारा



**पुणे** : देशातील अनेक राज्यांमध्ये तापमान झपाट्याने वाढत असून भारतीय हवामान खात्याने उष्णतेचा इशारा दिला आहे. निरभ्र आकाश आणि पश्चिमी विक्षोभाचा अभाव यामुळे उत्तर व पश्चिम भारतात उष्णता वाढत आहे. हिमाचल प्रदेश, राजस्थान, गुजरात, तसेच आंध्र प्रदेश आणि मधील काही भागांत ७ ते १० मार्चदरम्यान उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. ९ मार्चला कोकण आणि गुजरात किनारपट्टीवर तीव्र उष्णता जाणवू शकते. दरम्यान, महाराष्ट्रातही पुढील काही दिवस तापमान वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

### शेजारील राष्ट्रांवर हल्ल्यांमुळे तणाव वाढला; मध्यपूर्वेत युद्धाची व्याप्ती विस्तारण्याची भीती

# इराणने मागितली आखाती देशांची माफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दुबई** : मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी शेजारी देशांवरील हल्ल्यांसाठी माफी मागितली आहे. मात्र, त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराणने बिनशर्त शरणागती पत्करावी या मागणीला ठाम नकार दिला. इराणच्या शहरांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ले सुरू असतानाच राष्ट्राध्यक्षांनी हा संदेश दिल्याने प्रदेशातील तणाव अधिक वाढल्याचे दिसत आहे.

इराणने २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या हवाई हल्ल्यांनंतर मध्यपूर्वेत संघर्ष तीव्र झाला आहे. या संघर्षात इस्रायल आणि अमेरिकेकडून इराणच्या लष्करी ठिकाणांवर तसेच अणु कार्यक्रमाशी संबंधित केंद्रांवर हल्ले करण्यात आले आहेत. या हल्ल्यांमुळे इराणचे राजकीय आणि लष्करी नेतृत्व मोठ्या दबावाखाली आले आहे.

राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांनी दिलेल्या निवेदनात शेजारी देशांवर झालेल्या हल्ल्यांबद्दल दिलगिरी व्यक्त करताना सांगितले की, "इराणने ज्या देशांवर हल्ले केले आहेत त्यांच्याकडून मी माफी मागतो. या प्रश्नाचे समाधान युद्धाऐवजी राजनैतिक मार्गाने व्हावे, ही आमची भूमिका आहे." त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, शेजारी देशांनी हल्ला केल्याशिवाय त्यांच्या विरोधात कारवाई करू नये, असा सल्ला त्यांनी लष्कराला दिला आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी सोशल मीडियावर इशारा देत म्हटले की युद्धात आणखी इराणी अधिकारी लक्ष्य होऊ शकतात. "आज इराणला मोठा फटका बसू शकतो," असे त्यांनी लिहिले. त्यांनी इराणच्या माफीची नोंद घेतली असली तरी, इराणच्या आक्रमक वर्तनामुळे कठोर कारवाईचा इशाराही दिला.

संघर्षाचा परिणाम आखाती देशांवरही दिसून येत आहे. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या हल्ल्यांमुळे काही काळ उड्डाणे विस्कळीत झाली. सौदी अरेबियाने त्यांच्या शायबा तेल क्षेत्राकडे येणारे ड्रोन पाडल्याचा दावा केला, तर बहरीनमध्ये सायरन वाजवत नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

या संघर्षात आतापर्यंत मोठी जीवितहानी झाली आहे. विविध अहवालांनुसार इराणमध्ये किमान १,२३० जणांचा मृत्यू झाला असून लेबनॉनमध्ये २०० हून अधिक आणि इस्रायलमध्ये ११ जण ठार झाले आहेत. सहा अमेरिकन सैनिकांचाही मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आखाती देशांतून होणाऱ्या ऊर्जा पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १५० डॉलर्सपर्यंत जाऊ शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील हा संघर्ष जागतिक पातळीवर चिंतेचा विषय ठरत आहे

# भारताला रशियन तेलासाठी परवानगीची गरज नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : रशियाकडून तेल आयात करण्यासाठी अमेरिकेने परवानगी दिल्याच्या दाव्याला भारताने ठाम शब्दांत फेटाळले आहे. भारत सरकारने शनिवारी स्पष्ट केले की, रशियन तेल खरेदी करण्यासाठी नवी दिल्लीला कोणत्याही देशाच्या परवानगीची आवश्यकता नाही आणि भारत रशियाकडून तेल आयात सुरूच ठेवणार आहे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. या घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांना मार्ग न देण्याची धमकी दिल्याने जागतिक तेलपुरवठ्याबाबत चिंता वाढली असून त्याचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या दरांवर झाला आहे.

भारत सरकारच्या पत्र सूचना कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, रशियन तेल खरेदीसाठी भारत कोणत्याही अल्पकालीन सवलतींवर अवलंबून नाही. निवेदनात म्हटले आहे की, भारताने कधीही रशियन तेल आयातीसाठी कोणत्याही देशाच्या परवानगीवर अवलंबून राहिलेले नाही. फेब्रुवारी २०२६ पर्यंत भारत रशियाकडून तेल आयात करत असून रशिया हा भारताचा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार असल्याचेही सरकारने नमूद केले आहे.

दरम्यान, भारत आणि अमेरिका यांच्यातील अंतरिम व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेने भारतीय निर्यातीवरील २५ टक्के शुल्क मागे घेतले होते.

# महिला दिनानिमित्त मेट्रो स्थानके महिलांकडूनच संचलित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) तर्फे विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो लाईन ३ (अ‍ॅक्वा लाईन) वरील मरोळ नाका आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ही दोन महत्त्वाची मेट्रो स्थानके ८ मार्च २०२६ रोजी पूर्णपणे महिला कर्मचाऱ्यांकडून संचलित केली जाणार आहेत.

शहरी वाहतूक व्यवस्थेमध्ये महिलांचा वाढता सहभाग आणि महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या दोन्ही स्थानकांवरील सर्व दैनंदिन कामकाज महिलांकडूनच पार पाडले जाणार आहे. स्थानक नियंत्रण, तिकीटिंग, प्रवासी सहाय्य, सुरक्षा व्यवस्था, देखभाल सहाय्य तसेच हाऊसकीपिंग अशा विविध जबाबदाऱ्या महिला कर्मचाऱ्यांकडे असतील. दिवसभरातील वेगवेगळ्या शिफ्टमध्ये एकूण ८५ महिला कर्मचारी या दोन स्थानकांचे कामकाज सांभाळणार आहेत.

याशिवाय अ‍ॅक्वा लाईनच्या संचालनामध्येही महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या मार्गावर सध्या २७ महिला ट्रेन ऑपरेटर्स (मेट्रो पायलट) नियमितपणे मेट्रो गाड्या चालवत आहेत. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमध्ये एकूण १,३८८ महिला कर्मचारी विविध पदांवर कार्यरत आहेत. यात कार्यालयीन कर्मचारी तसेच ऑपरेशन्स, तिकीटिंग, हाऊसकीपिंग आणि सुरक्षा सेवांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांचा समावेश आहे.

### पश्चिम आशियातील युद्धस्थितीवर व्यक्त केली चिंता

# अण्णा हजारे यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राळेगणसिद्धी** : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. इराण-इस्रायल आणि अमेरिका यांच्यात वाढत चाललेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने जागतिक स्तरावर शांततेसाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंती त्यांनी या पत्रातून केली आहे.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचे परिणाम जगभरात जाणवत आहेत. या संघर्षात हजारो निरपराध नागरिकांचा जीव गेला असून महिला, मुले आणि सामान्य कुटुंबांवर मोठा परिणाम होत असल्याचे अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे. युद्धाची झळ सर्वाधिक सामान्य नागरिकांनाच बसते, त्यामुळे मानवतेच्या दृष्टीने अशा संघर्षांना आळा घालणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

भारताची परंपरा ही अहिंसा, शांतता आणि संवाद यावर आधारित असल्याचे त्यांनी पत्रात अधोरेखित केले आहे. महात्मा गांधी यांच्या विचारसरणीने प्रेरित झालेला भारत नेहमीच जगाला शांततेचा संदेश देत आला आहे त्यामुळे सध्याच्या संवेदनशील परिस्थितीत भारताने जगासमोर संवादाचा मार्ग ठेवत शांततेसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

युद्धामुळे केवळ विनाश, अस्थिरता आणि मोठ्या प्रमाणावर मानवी हानी होते. कोणत्याही संघर्षातून दीर्घकालीन समाधान मिळत नाही. उलट संवाद, सहकार्य आणि परस्पर विश्वासाच्या माध्यमातूनच स्थैर्य आणि समाधानाचा मार्ग निर्माण होऊ शकतो, असे अण्णा हजारे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

आजच्या जगाला शस्त्रास्त्रांची नव्हे तर विश्वास, सहकार्य आणि संवादाची आवश्यकता आहे. वाढती शस्त्रस्पर्धा आणि युद्धाची मानसिकता मानवजातीसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भारताने तटस्थ आणि जबाबदार भूमिका घेत जागतिक स्तरावर शांततेसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अनेक जागतिक प्रश्नांवर सकारात्मक आणि संतुलित भूमिका बजावली आहे, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. भारताचा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढत असलेला प्रभाव लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत भारताने मानवतेच्या आणि शांततेच्या बाजूने उभे राहून संवादाचा मार्ग मजबूत करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

निरपराध नागरिकांवर होत असलेले परिणाम अत्यंत दुःखद असल्याचे सांगत भारतासारख्या मोठ्या लोकशाही राष्ट्राने जगाला शांततेचा मार्ग दाखवणे ही काळाची गरज असल्याचे अण्णा हजारे यांनी पत्रातून स्पष्ट केले आहे. संवाद आणि सहकार्याच्या माध्यमातूनच जगात स्थैर्य निर्माण होऊ शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

### ऊर्जा सुरक्षेबाबत सरकारचा विश्वास

# पेट्रोल-डिझेल दरवाढीचा प्रश्न नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत केंद्र सरकारने दिलासादायक माहिती दिली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीशी संबंधित जागतिक आव्हाने असूनही देशातील ऊर्जा साठा पुरेसा असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणतीही वाढ होणार नसल्याचे सरकारी सूत्रांनी स्पष्ट केले.

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी चढउतार सुरू असताना केंद्र सरकारने ग्राहकांना दिलासा देण्याची भूमिका घेतली आहे. ऊर्जा साठ्याची स्थिती समाधानकारक असल्याने परिस्थिती हाताळण्याबाबत सरकारचा आत्मविश्वास वाढल्याचे सूत्रांनी सांगितले. सरकारने कच्च्या तेलाच्या आयातीसाठी एकाच मार्गावर अवलंबून न राहता विविध स्रोतांवर भर देण्याचे धोरण स्वीकारले आहे. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी स्रोतांकडून आयात वाढविण्यात आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, यापूर्वी सुमारे ६० टक्के कच्चे तेल होर्मुझ सामुद्रधुनीव्यतिरिक्त इतर स्रोतांकडून आयात केले जात होते. आता हा आकडा वाढून सुमारे ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. म्हणजेच एकूण आयातीपैकी अतिरिक्त १० टक्के तेल विविध स्रोतांकडून मिळविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे पुरवठा साखळी अधिक मजबूत झाली असून एखाद्या मार्गावर व्यत्यय आला तरी त्याचा देशावर मोठा परिणाम होणार नाही. रशिया, अमेरिका आणि कॅनडा यांसारख्या देशांकडून कच्च्या तेलाची आयात वाढवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, एलपीजी सिलिंडरच्या किंमती वाढणार असल्याच्या आरोपांवर सरकारने स्पष्ट भूमिका मांडली आहे. काँग्रेसकडून करण्यात आलेल्या आरोपांना उत्तर देताना सूत्रांनी सांगितले की, पेट्रोल आणि डिझेलच्या दरांबाबत सरकारने दिलेले आश्वासन एलपीजीसाठी लागू होत नाही. तथापि, पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढविण्याचा कोणताही निर्णय सध्या विचाराधीन नसल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले. महागाईच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून सरकारवर टीका होत असली तरी ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देत परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

### पंढरपूर मतदारसंघासाठी ५०१ कोटींची तरतूद

**पंढरपुर** : राज्याच्या २०२६-२७ अर्थसंकल्पात पंढरपुर-मंगळवेडा विधान सभा मतदार संघामधील विविध विकासकामांसाठी ५०१ कोटी १६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती आमदार समाधान अवताडे यांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात मंगळवेढा उपसा सिंचन योजनेसाठी ६० कोटी, वाखरी-टाकळी-अनवली-मुंढेवाडी रिंग रोडसाठी २१८ कोटी आणि विविध रस्ते प्रकल्पांसाठी मोठा निधी मंजूर झाला आहे. तसेच भीमा नदी (चंद्रभागा) वर नवीन पूल, उड्डाणपूल आणि ग्रामीण रस्त्यांच्या सुधारणा-रुंदीकरणासाठीही निधी देण्यात आला आहे. या निधीमुळे मतदारसंघातील पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळेल .

# बंगालमध्ये बेरोजगारांना १,५०० रु. भत्ता

### ममता बॅनर्जी यांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दहावी (माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण बेरोजगार तरुणांना दरमहा १,५०० रुपयांचा भत्ता देण्याची घोषणा केली. बेरोजगार युवक-युवतींना आत्मनिर्भर भविष्याकडे वाटचाल करता यावी, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला निवडणूक आयोगाकडून मतदार यादीच्या विशेष गहन पुनरिक्षणादरम्यान (एसआयआर) मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याच्या निषेधार्थ आयोजित धरनेदरम्यान ममता बॅनर्जी यांनी ही घोषणा केली.

या योजनेनुसार माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या २१ ते ४० वयोगटातील युवक-युवतींना ७ मार्चपासून दरमहा १,५०० रुपये दिले जाणार आहेत. ही योजना मूळतः एप्रिलपासून सुरू करण्याचे नियोजन होते, मात्र ती तातडीने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे बॅनर्जी यांनी सांगितले. युवा साथी योजनेअंतर्गत जे विद्यार्थी अद्याप शिक्षण घेत आहेत आणि शिष्यवृत्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेत नाहीत, त्यांनाही या योजनेचा फायदा मिळणार आहे. "यापूर्वी आम्ही १ एप्रिलपासून पैसे देण्याचे सांगितले होते. मात्र उद्या आंतरराष्ट्रीय महिला दिन असल्याने भेट म्हणून आम्ही पेमेंटची तारीख १ एप्रिलवरून बदलून आज, म्हणजे ७ मार्च केली आहे," असे बॅनर्जी यांनी सांगितले.

राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाल्याचा दावा करत ममता बॅनर्जी म्हणाल्या की, बंगालमधील बेरोजगारीचा दर सुमारे ४० टक्क्यांनी घटला आहे. "आम्ही किमान ४० लाख लोकांना कौशल्य प्रशिक्षण दिले असून त्यापैकी सुमारे १० लाख जण आधीच रोजगारात दाखल झाले आहेत," असे त्यांनी सांगितले.

### डॉक्टरांच्या मते स्क्रीन टाईम थेट मुलांच्या मेंदूवर परिणाम करतो

# स्क्रीन टाईम'चा मुलांच्या वर्तणुकीवर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : मोबाईल, टॅब आणि टीव्हीसमोर जास्त वेळ घालवणा-या मुलांमध्ये दिवसेंदिवस स्वभावातील आक्रमकपणा, चिडचिड, नैराश्य, एकाग्रतेचा अभाव दिसून येतो आणि वर्तणुकीतील समस्यांमध्येही वाढ होत असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली. शारीरिक हालचालींचा अभाव आणि डिजिटल साधनांचा वाढता वापर हे यामागील प्रमुख घटक आहेत.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार वाढता स्क्रीन टाईम थेट मुलांच्या मेंदूवर परिणाम करतो. डिजिटल कंटेंट मेंदूतील 'रिवॉर्ड सिस्टीम' सतत सक्रिय ठेवतो, ज्यामुळे डोपामाईनचे प्रमाण वाढते आणि मुलांना सतत उत्तेजनाची सवय लागते. दर महिन्याला ४ ते १४ वयोगटातील सुमारे ८ ते १० मुलांमध्ये आक्रमकपणा, चिडचिड होणे, झोपेच्या तक्रारी, एकाग्रतेचा अभाव आणि एकाकीपणा अशा समस्या उद्भवत आहेत.

वाढत्या स्क्रीन टाईममुळे मुलांची त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी होते. संवाद कमी झाल्याने भाषेच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. तसेच, सायबरबुलिंग किंवा चुकीच्या ऑनलाईन कंटेंटमुळे मुलांच्या आत्मविश्वासावर त्याचा परिणाम होतो. तज्ज्ञांच्या मते, या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास पुढे नैराश्य, आत्मविश्वास कमी होणे आणि कुटुंबातील तणाव वाढू शकतो. मात्र, वेळीच उपचार केल्यास मुलांच्या वर्तणुकीत सुधारणा शक्य आहे. मुलांच्या वर्तणुकीत बदल जाणवल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये.

स्क्रीनचा मर्यादित वापर, सक्रिय जीवनशैली आणि पालकांकडून मानसिक आधार मिळाल्यास मुलांचे मानसिक आणि शैक्षणिक आरोग्य सुरक्षित राहते. वाढत्या स्क्रीन टाईममुळे मुलं आपल्या कुटुंबापासून दूर राहू लागतात, अभ्यासात मागे पडतात आणि गॅझेट्स हातातून काढून घेतल्यावर संताप व्यक्त करतात. दर महिन्याला ४ ते ५ मुले ही एकाग्रता कमी होणे, डोकेदुखी, कल्पनाशक्तीचा अभाव आणि कुटुंबीयांशी कमी संवाद अशा तक्रारींसह येतात. यामुळे वेळीच पालकांनी लक्ष द्यावे.

**पालकांसाठी महत्त्वाच्या सूचना**

२ वर्षांवरील मुलांचा स्क्रीन टाईम दिवसाला दोन तासांपर्यंत मर्यादित ठेवावा, दररोज किमान ४५ मिनिटे मैदानी खेळ किंवा व्यायामाला प्रोत्साहन द्यावे, जेवताना तसेच झोपण्यापूर्वी खोलीत मोबाईलचा वापर टाळा, मुलांशी नियमित संवाद साधून त्यांच्या भावना समजून घ्या, गरज असल्यास समुपदेशन किंवा वर्तणुकीसंबंधित उपचार घ्या.

### राहुल गांधींचा आरोप

# "देशाचा डेटा अमेरिकेकडे सोपवला"

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या व्यापार करारावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. या करारामुळे भारताची मौल्यवान डेटा संसाधने प्रभावीपणे अमेरिकेकडे सोपवण्यात आली आहेत, असा आरोप त्यांनी केला. डेटाची मालकी आणि संरक्षण यासारख्या गंभीर मुद्द्यांकडे दुर्लक्ष होत असून सार्वजनिक चर्चेचा भर किरकोळ विषयांवर आहे, असेही त्यांनी म्हटले.

केरळमधील तिरुवनंतपुरम येथे टेक्नोपार्कमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिकांशी संवाद साधताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी डेटा संरक्षण आणि आर्थिक धोरणांवर भाष्य केले. त्यांनी सबसिडी आणि तथाकथित "फ्रीबीज" या विषयावर व्यापक सार्वजनिक चर्चा होण्याची गरज व्यक्त करत गरीबांना मिळणाऱ्या मदतीवर टीका का केली जाते, असा सवाल उपस्थित केला. डेटा संरक्षणाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राहुल गांधी यांनी भारत-अमेरिका व्यापार कराराचा उल्लेख केला. या कराराच्या वाटाघाटींमध्ये भारताने आपल्या डेटा संपत्तीच्या मूल्याचा योग्य वापर करण्यात अपयश आल्याचा दावा त्यांनी केला.

ते म्हणाले, जर भारताने कराराच्या चर्चेत ठाम भूमिका घेतली असती आणि "भारतातील डेटा हा जगातील सर्वात मौल्यवान संसाधन आहे" असे सांगितले असते, तर शेतीवर किंवा लघु व मध्यम उद्योगांवर कोणताही अतिरिक्त कर लादला गेला नसता. यशस्वी वाटाघाटींसाठी स्वतःची ताकद ओळखणे अत्यंत महत्त्वाचे असते, असेही त्यांनी नमूद केले.

## संपादकीय

# जागतिक संघर्षात सर्वाधिक होरपळते ती महिला



**ज्या समाजात स्त्री असणे हीच एक प्रकारची लढाई बनते, त्या समाजातील महिलांच्या संघर्षाचे भान ठेवणे आवश्यक आहे. आपण त्यांच्या परिस्थितीत थेट बदल घडवू शकत नसलो तरी त्यांच्या अस्तित्वाची, त्यांच्या वेदनांची आणि त्यांच्या संघर्षाची जाणीव ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे**

जगाच्या इतिहासाकडे पाहिले तर एक गोष्ट सतत जाणवते— युद्धे पुरुषांनी ठरवली, लढली आणि त्यातून राजकीय, धार्मिक किंवा सामरिक सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु या युद्धांच्या सर्वाधिक झळा मात्र स्त्रिया आणि लहान मुलांनाच सहन कराव्या लागल्या. इराण असो, इस्रायल असो, येमेन, इराक, सीरिया किंवा अफगाणिस्तान — धर्मप्रभुत्व, राजकीय वर्चस्व आणि सत्तेच्या संघर्षात स्त्रियांचे आयुष्यच सर्वाधिक उद्ध्वस्त होताना दिसते. युद्धाच्या बातम्या जगभर झळकतात तेव्हा त्या बहुतेक वेळा रणांगण, सैन्याची ताकद, शस्त्रास्त्रे किंवा राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांभोवती फिरत असतात. पण या संघर्षामध्ये सामान्य नागरिकांचे, विशेषतः स्त्रिया आणि मुलांचे आयुष्य कसे उद्ध्वस्त होते, याकडे क्वचितच लक्ष दिले जाते. अनेकदा युद्धात ज्या लोकांचा प्रत्यक्ष सहभाग नसतो, तेच त्याचे सर्वात मोठे बळी ठरतात इस्रायल आणि अमेरिकेने इराणविरोधात केलेल्या कारवाईदरम्यान इराणमधील मिनाब शहरातील एका शाळेवर टाकलेल्या मिसाइलमुळे तब्बल १६० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याची घटना ही अशा अमानुष वास्तवाचे उदाहरण आहे. या मुली कोणत्याही युद्धात सहभागी नव्हत्या. त्यांचे एकमेव "गुन्हे" इतकेच होते की त्या एका विशिष्ट देशात जन्माला आल्या होत्या आणि मोठ्या होऊन त्या समाजाचा भाग बनल्या असत्या. परंतु युद्धाच्या क्रूर गणितात निरपराध जीवांचे मूल्य फारच कमी असते. मानवी इतिहासात युद्ध म्हणजे शौर्य, विजय आणि पराक्रम यांचे रोमँटिक चित्र अनेकदा रंगवले जाते. "युद्धस्य कथा रम्या" असे म्हणणाऱ्यांच्या कथांमध्ये रणांगणातील वीरतेचे वर्णन असते; परंतु त्या कथांमध्ये बलात्कार, अपहरण, कुटुंबांचे विघटन आणि स्त्रियांचे दुःख यांचा उल्लेख क्वचितच आढळतो. प्रत्यक्षात मात्र युद्धाचे सर्वात मोठे ओझे स्त्रियांच्या खांद्यावरच येते पश्चिम आशियातील अनेक देशांमध्ये स्त्रियांचे जीवन हे केवळ युद्धामुळेच नव्हे तर सामाजिक आणि धार्मिक बंधनांमुळेही कठीण झाले आहे. इराणमध्ये गेली अनेक दशके स्त्रिया आणि पुरुषप्रधान सत्ताव्यवस्था यांच्यात एक प्रकारचे संघर्षमय नाते निर्माण झाले आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या शिरीन इबादी आणि नर्गिस मोहम्मदी या दोन इराणी महिलांना अनुक्रमे २००३ आणि २०२३ साली शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला. ही बाबच इराणमधील स्त्रियांच्या संघर्षाची साक्ष देते.
इराणमध्ये स्त्रियांच्या वेशभूषेवरही कठोर निर्बंध आहेत. सार्वजनिक ठिकाणी हिजाब परिधान करणे बंधनकारक आहे. १९७९ मध्ये आयातोल्ला खोमेनी यांनी हा नियम लागू केल्यानंतर अनेक महिलांनी त्याविरोधात आंदोलन केले, परंतु त्याचा फारसा परिणाम झाला नाही. २०२२ मध्ये महसा अमीनी या तरुणीला हिजाब योग्य प्रकारे न घातल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली आणि कोठडीत तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर "वुमन, लाईफ, फ्रीडम" या घोषणेसह मोठे आंदोलन उभे राहिले, परंतु ते कठोरपणे दडपण्यात आले. इराणमध्ये मुलींसाठी विवाहाचे किमान वय १३ वर्षे आहे. घटस्फोटाच्या बाबतीत पुरुषांना अधिक अधिकार आहेत, तर स्त्रियांना अनेक अटी सिद्ध कराव्या लागतात. न्यायालयात एका पुरुषाची साक्ष दोन स्त्रियांच्या साक्षीइतकी मानली जाते. या सगळ्या गोष्टी स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे चित्र स्पष्ट करतात. परंतु स्त्रियांचे प्रश्न केवळ इराणपुरते मर्यादित नाहीत. इस्रायलमध्येही कायद्याने स्त्री-पुरुष समानता असली तरी धार्मिक परंपरा आणि सामाजिक रुढींमुळे अनेक अडचणी निर्माण होतात. काही धार्मिक समुदायांमध्ये स्त्रियांच्या वेशभूषेवर आणि सार्वजनिक जीवनातील सहभागावर निर्बंध आहेत. विवाह आणि घटस्फोटाच्या प्रश्नांमध्येही धार्मिक न्यायालयांचा मोठा प्रभाव आहे. काही स्त्रिया पतीने घटस्फोट नाकारल्यामुळे अनेक वर्षे अडकून राहतात. येमेन, इराक आणि सीरिया यांसारख्या देशांमध्ये दीर्घकाळ चाललेल्या युद्धांमुळे महिलांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. सततच्या संघर्षामुळे कुटुंबांचे विस्थापन, आर्थिक अस्थैर्य, अन्नटंचाई आणि बालविवाह यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत महिलांवर घर, मुलांचे संगोपन आणि कुटुंब टिकवण्याची जबाबदारी येते. दरवर्षी ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. अनेक ठिकाणी हा दिवस उत्सवाच्या स्वरूपात साजरा केला जातो. महिलांसाठी विशेष कार्यक्रम, सवलती आणि गौरव समारंभ आयोजित केले जातात. परंतु या उत्सवी वातावरणाच्या पलीकडे जगातील अनेक महिलांचे वास्तव अत्यंत कठीण आहे.कारण युद्धे कोणीही सुरू करतात, पण त्याची सर्वात मोठी किंमत अनेकदा त्या लोकांना मोजावी लागते ज्यांनी युद्धाची निवड केलेली नसते. आणि त्या मध्ये सर्वात पुढे असतात—स्त्रिया.

# इराण-इस्रायल संघर्ष आणि भारताचे मौन

**» युद्ध आणि संघर्षाच्या वातावरणात कोणती भूमिका घ्यायची हा प्रत्येक देशासमोरील कठीण प्रश्न असतो. मात्र जागतिक स्तरावर वाढत्या अस्थिरतेच्या काळात शांततेचा संदेश देणाऱ्या देशांनी आपली भूमिका अधिक स्पष्ट आणि विश्वासार्ह ठेवणेही तितकेच महत्त्वाचे ठरते.**



पश्चिम आशियात सुरू असलेल्या इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्र धोरणाबद्दल अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. जगाला "वसुधैव कुटुंबकम्"चा संदेश देणाऱ्या भारताने आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये कोणती भूमिका घ्यावी, यावर सध्या चर्चा सुरू आहे. विशेषतः इराणशी ऐतिहासिक, आर्थिक आणि सामरिक संबंध असतानाही भारताचे तुलनेने मितभाषी किंवा सावध धोरण अनेकांना विचार करायला भाग पाडत आहे.

यासंदर्भातभारताजवळील समुद्रात घडलेली एक घटना विशेष चर्चेत आली. अमेरिकेने इराणची एक युद्धनौका बुडविल्याची बातमी समोर आली आणि त्यात ८५ इराणी नौसैनिकांचा मृत्यू झाला. ही घटना आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय ठरली. विशेष म्हणजे ही नौका काही काळापूर्वी भारतातील विशाखापट्टणम येथे बहुराष्ट्रीय नौदल कवायतीत सहभागी होण्यासाठी आली होती. त्या वेळी इराणी नौसैनिकांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला होता आणि भारतीय पाहुणचाराचा अनुभवही घेतला होता. युद्ध सुरू झाल्यानंतर ही नौका मायदेशी परतत असताना तिच्यावर हल्ला झाला.

या घटनेनंतर जगातील काही देशांनी या कारवाईवर प्रश्न उपस्थित केले. परंतु भारताकडून याबाबत फारसा स्पष्ट निषेध व्यक्त झाला नाही, असे काही विश्लेषकांचे मत आहे. भारताने थेट हस्तक्षेप करण्याची गरज नसली तरी किमान मानवी दृष्टिकोनातून प्रतिक्रिया अपेक्षित होती, असेही काहींचे म्हणणे आहे. या मुद्द्यावरून भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलन आणि सावध भूमिका पुन्हा चर्चेत आली.

दुसरीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्यानंतरही काही राजनैतिक प्रश्न उपस्थित झाले. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी त्या दौऱ्याला मोठे महत्त्व दिले होते. दोन्ही देशांमधील मैत्री, सहकार्य आणि संरक्षण क्षेत्रातील संबंध अधिक दृढ करण्याचा संदेश या भेटीतून दिला गेला. इस्रायलच्या संसदेतही भारतीय पंतप्रधानांचा गौरव करण्यात आला. या दौऱ्यानंतर विविध आर्थिक आणि तांत्रिक करारांची शक्यता व्यक्त करण्यात आली.

काही विश्लेषकांच्या मते, भारतासारख्या मोठ्या देशाला पश्चिम आशियातील या संघर्षात संतुलन राखण्याची कसरत करावी लागत आहे. कारण भारताचे इस्रायलशी संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाचे संबंध आहेत, तर इराणशी ऊर्जा, व्यापार आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे जवळीक आहे.

इराण हा 'ब्रिक्स' समूहाचा सदस्य देश आहे. या संघटनेतील इतर काही देशांनी पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत अधिक स्पष्ट भूमिका घेतली आहे. उदाहरणार्थ, दक्षिण आफ्रिकेने आंतरराष्ट्रीय न्यायालयात इस्रायलविरोधात कारवाईची मागणी केली होती. अशा पार्श्वभूमीवर भारताची भूमिका अधिक सावध आणि मितभाषी राहिल्याचे निरीक्षण अनेक तज्ज्ञांनी नोंदवले आहे.

भारत आणि इराण यांचे संबंध केवळ राजकीय नाहीत तर आर्थिक आणि ऐतिहासिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहेत. इराण भारतासाठी दीर्घकाळ महत्त्वाचा तेलपुरवठादार राहिला आहे. काही काळ भारताने इराणकडून तेल व्यवहार रुपयांतही केले होते. तसेच भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा 'नॉर्थ-साउथ ट्रान्स्पोर्ट कॉरिडॉर' प्रकल्पही इराणमार्गे युरोप आणि मध्य आशियाशी संपर्क वाढवण्याच्यादृष्टीनेमहत्त्वाचा आहे. इराणमधील चाबहार बंदराच्या विकासातही भारताची गुंतवणूक आहे, ज्यामुळे पाकिस्तानला वळसा घालत अफगाणिस्तान आणि मध्य आशियात पोहोचणे भारतासाठी सुलभ होते.

इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर भारत-इराण सांस्कृतिक संबंधही दीर्घकाळ टिकून आहेत. झोराष्ट्र धर्मीय पारशी समाज इराणमधून भारतात आला आणि त्यांनी देशाच्या औद्योगिक व सामाजिक विकासात मोठे योगदान दिले. टाटा आणि गोदरेज यांसारख्या उद्योगसमूहांची परंपरा याच पारशी समाजातून निर्माण झाली. त्यामुळे भारत-इराण संबंध हे केवळ राजकीय समीकरणांपुरते मर्यादित नसून त्यामागे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक घटकही आहेत.

तथापि, आजच्या बदलत्या जागतिक राजकारणात प्रत्येक देशाला अनेक समतोल साधावे लागतात. भारताचे अमेरिकेसोबत वाढते धोरणात्मक सहकार्य, इस्रायलसोबतचे संरक्षण संबंध आणि पश्चिम आशियातील ऊर्जा हितसंबंध या सगळ्यांच्या दरम्यान भारताने सावध भूमिका स्वीकारल्याचे दिसते. परराष्ट्र धोरणात अनेकदा स्पष्ट भूमिका घेण्यापेक्षा संतुलन राखणे अधिक महत्त्वाचे ठरते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# अर्थसंकल्पातून विकासाची गती – आ. अमित गोरखे

## शहराच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या २०२६–२७ च्या अर्थसंकल्पातून पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मत अमित गोरखे यांनी व्यक्त केले. मेट्रो विस्तार, रेल्वे सेवेचे सक्षमीकरण तसेच औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना निधी मिळाल्याने शहराच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

या अर्थसंकल्पात पिंपरी-चिंचवड व परिसरासाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींचे स्वागत करत आमदार गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महायुती सरकारचे आभार मानले.

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी मिळाली या प्रकल्पामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील वाहतूक सुलभ होऊन नागरिकांच्या प्रवासाला मोठा दिलासा मिळणार आहे.

पुणे–लोणावळा दरम्यान तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन उभारण्यासाठी सुमारे ५,१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड, आकुर्डी व तळेगाव परिसरातील नोकरदार, विद्यार्थी आणि औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.

औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या मार्गांसाठी सरकारने मोठा निधी जाहीर केला आहे. नाशिक फाटा–खेड मार्गासाठी ७,८०८ कोटी रुपये, तळेगाव–चाकण–शिक्रापूर मार्गासाठी ४,००० कोटी रुपये आणि पुणे–शिरूर मार्गासाठी ७,५१५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे उद्योगनगरीतील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसर 'ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर' (GCC) साठी देशातील महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत असून या माध्यमातून सुमारे चार लाख उच्च-कुशल रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. याचा लाभ आयटी आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील तरुणांना होणार आहे.

शहराच्या विकासाबरोबरच सामाजिक न्यायालाही सरकारने प्राधान्य दिले असल्याचे आमदार गोरखे यांनी नमूद केले. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय ऐतिहासिक असून अनुसूचित जातींसाठी २३,१५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# जागतिक महिला दिनानिमित्त सन्मान सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जागतिक महिला दिनानिमित्त "आम्ही भारताचे लोक - आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ" यांच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यासाठी विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाद्वारे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, प्रशासकीय तसेच व्यावसायिक क्षेत्रात कार्य करून समाजासाठी प्रेरणादायी योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात निवडलेल्या महिलांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पुष्प देऊन त्यांचा गौरव केला जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करून समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यास सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असून "आम्ही भारताचे लोक - आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ" या संघटनेचे पदाधिकारी, सदस्य सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रम ८ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता पुण्यातील वाडिया कॉलेज समोरील महामाता रमाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कलाकार कट्टा जतन करावा ; पँथर संघटनेचे आयुक्तांना निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहराच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा भाग मानल्या जाणाऱ्या "पुणे कलाकार कट्टा"च्या अस्तित्वाबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर पँथर संघटनेच्या वतीने पुणे महानगरपालिकेचे आयुक्त यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पुणे कलाकार कट्टा हा कवी, लेखक, चित्रकार, नाट्यकर्मी तसेच विविध कलाक्षेत्रातील कलाकारांसाठी मुक्त अभिव्यक्तीचे प्रभावी व्यासपीठ म्हणून ओळखला जातो. अनेक वर्षांपासून येथे नवोदित तसेच प्रस्थापित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळत आहे. हे निवेदन पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय नडगेरी यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. कलाकारांना मूलभूत सुविधा देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी विशाल आदमाने (युवा अध्यक्ष, पुणे जिल्हा), राजवर्धन कांबळे (युवा अध्यक्ष, पुणे शहर), सचिन जाधव (उपाध्यक्ष, पुणे जिल्हा), तुषार परदेशी (युवा उपाध्यक्ष, पुणे शहर), प्रदीप परदेशी (उपाध्यक्ष, कोथरूड विधानसभा) आणि संघशिल भद्रे (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, पुणे) आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'मलवाझी' सर्वोत्कृष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात केरळ राज्यातील मल्याळम भाषेतील 'मलवाझी' या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान पटकावत महोत्सवात विशेष ठसा उमटवला. तर मराठी भाषेतील 'अ स्टोरी कार्वेड ऑन अ ट्री' या लघुपटाने सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार पटकावला.

ॲनिमेशन विभागात राजस्थान येथील 'द वेट वॉल' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन चित्रपटाचा सन्मान मिळाला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार दुलाल रॉय आणि प्रणव जोशी यांना, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिथिला हिरेमठ यांना प्रदान करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या 'साबर बोंडं' या चित्रपटाचे दिग्दर्शक रोहन कानवडे यांना 'पीसीआयएफएफ युवा प्रेरणादायी सिने आयकॉन पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले.

या महोत्सवात भारतासह जर्मनी, इटली, स्पेन, पोलंड, ब्राझिल आणि युएईसह तब्बल ४३ देशांमधील ११६ हून अधिक चित्रपट, लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन आणि ६० सेकंदांचे चित्रपट प्रदर्शित करण्यात आले.

महानगरपालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी व गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी-चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ आयोजित करण्यात आला होता.

आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात देश-विदेशातील कलाकारांना विविध विभागांतील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा, कला व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्या प्रियंका कुदळे, महापालिका उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, चित्रपट निर्माते नितीन वैद्य, अभिनेते श्रीकांत यादव, दिग्दर्शक तेजस देऊसकर, अभिनेते इनाम उल हक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. तीन दिवस रंगलेल्या या महोत्सवात सर्व वयोगटातील रसिकांनी घेतला.

## मुंबई, दिल्ली, बंगळुरूनंतर पुण्यात विस्तार; ३२ हजार चौरस फुटांच्या दालनात फर्निचरचे हजारो पर्याय

# आयकियाचे पुण्यात मोठे पाऊल; विमाननगरमध्ये पहिले दालन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** स्वीडनमधील जागतिक ख्यातीची घरगुती फर्निचर आणि होम डेकोर कंपनी आयकिया आता पुणेकरांच्या भेटीला येत आहे. मुंबई, दिल्ली आणि बंगळुरूनंतर कंपनीने पुण्यात विस्तार करत मोठे पाऊल टाकले आहे. आयकियाचे पुण्यातील पहिले दालन १२ मार्चपासून विमाननगर येथील फिनिक्स मॉलमध्ये ग्राहकांसाठी खुले होत आहे. या दालनामुळे पुणेकरांना आयकियाची विविध फर्निचर उत्पादने, घर सजावटीच्या वस्तू आणि आधुनिक डिझाइन प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे.

पुण्यातील हे दालन सुमारे ३२ हजार चौरस फुटांचे असून ग्राहकांना आपल्या घरासाठी आवश्यक असलेल्या विविध वस्तूंची निवड एकाच ठिकाणी करता येणार आहे. या दालनामध्ये सुमारे १ हजार ९०० उत्पादने पाहता येणार असून त्यापैकी १ हजार ७०० वस्तूंची थेट खरेदी ग्राहकांना करता येईल. याशिवाय सुमारे ४ हजार ५०० वस्तू ग्राहक ऑनलाइन नोंदणी करून घरपोच मागवू शकतात. त्यामुळे प्रत्यक्ष खरेदीसोबतच डिजिटल पर्यायांचाही लाभ ग्राहकांना मिळणार आहे.

पुणे शहरातील घरांच्या रचनेचा आणि स्थानिक जीवनशैलीचा विचार करून दालनात विविध खोल्यांची




मांडणी करण्यात आली आहे. पुणेरी घरांच्या आकारमानानुसार आणि गरजेनुसार फर्निचर कसे मांडता येईल, याचे मार्गदर्शन ग्राहकांना येथे मिळणार आहे. याशिवाय ग्राहकांना इंटिरिअर प्लॅनिंगसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शनही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे घर सजावटीचे नियोजन अधिक सोपे होणार आहे.

दालनात आयकियाचे प्रसिद्ध स्वीडिश कॅफेही असणार आहे. येथे ग्राहकांना स्वीडनमधील लोकप्रिय खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे खरेदीसोबतच एक वेगळा अनुभवही ग्राहकांना मिळणार आहे.
गेल्या सहा वर्षांपासून आयकियाची उत्पादने ऑनलाइन माध्यमातून पुणेकरांसाठी उपलब्ध होती. या कालावधीत कंपनीने सुमारे चार लाख ग्राहकांना सेवा दिली आहे. या अनुभवातून पुण्यातील ग्राहकांची जीवनशैली, आवडीनिवडी आणि घरगुती गरजांचा कंपनीने सखोल अभ्यास केला आहे.

कंपनीच्या माहितीनुसार पुणेकर स्मार्ट आणि बहुपयोगी फर्निचरला प्राधान्य देतात. पर्यावरणपूरक डिझाइन, मातकट रंगछटा आणि उपयोगी तसेच किफायतशीर वस्तूंना पुणेकरांची पसंती असल्याचे निरीक्षण कंपनीने नोंदवले आहे. या आवडीनिवडी पुणेकरांच्या व्यवहारिक आणि विचारशील जीवनशैलीचे प्रतिबिंब असल्याचेही कंपनीचे म्हणणे आहे.

आयकिया इंडिया चे मुख्याधिकारी पॅट्रिक अँटोनी यांनी सांगितले की, "पुण्याच्या जीवनशैलीतून आम्हाला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. पुणेकर व्यावहारिक आणि महत्त्वाकांक्षी स्वभावाचे असून ते शाश्वत जीवनशैलीबाबत अधिक जागरूक आहेत. या नव्या दालनाच्या माध्यमातून आम्ही पुणेकरांचे दैनंदिन जीवन अधिक सोयीस्कर आणि सुंदर बनविण्याचा प्रयत्न करीत आहोत." पुण्यात सुरू होणारे आयकियाचे हे पहिले दालन शहरातील फर्निचर आणि होम डेकोर बाजारात एक नवे आकर्षण ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# २२ मार्चला 'अशाही असतात प्रेमकविता'चा काव्यप्रयोग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** प्रेमाच्या विविध छटा, भावनिक गुंतागुंत आणि वास्तववादी अनुभवांचे संवेदनशील चित्र उलगडणारा 'अशाही असतात प्रेमकविता' हा अनोखा काव्यप्रयोग लवकरच पुणेकर रसिकांच्या भेटीला येत आहे. प्रेमाच्या वेगवेगळ्या भावना, त्यातील अंतर्मुख करणारे विचार आणि जीवनातील वास्तव यांची कलात्मक गुंफण या कार्यक्रमातून अनुभवायला मिळणार आहे.

रविवार, २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता हा विशेष काव्यप्रयोग सादर होणार आहे. टिळक रोड येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधव पटवर्धन सभागृहात हा कार्यक्रम रंगणार असून 'रमणी प्रेझेंट्स, पुणे' यांच्या वतीने त्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात कवी संदेश कर्डक, सुमित गुणवंत, रमणी बबिता आकाश, हृदयमानव अशोक आणि स्वराज समुद्र हे आपल्या कवितांमधून प्रेमाच्या विविध पैलूंना स्पर्श करणार आहेत. तसेच आशिष आणि करण यांच्या सुरेल संगीताची साथ या काव्यप्रयोगाला लाभणार असल्याने कार्यक्रमाला विशेष कलात्मक रंगत येणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रवेश मोफत असला तरी उपस्थित राहण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. इच्छुकांनी पोस्टरवरील क्यूआर कोड स्कॅन करून नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### महापौर निधी पुन्हा सुरू; रुग्णांना मिळणार मदत

**पिंपरी :** महापालिकेत प्रशासकीय राजवटीदरम्यान तब्बल चार वर्षे बंद असलेला महापौर निधी पुन्हा सुरू करण्यात आला आहे. या निधीतून शहरातील गरजू रुग्णांना पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यास सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती रवी लांडगे यांनी दिली.

प्रशासकीय राजवटीतील लालफितीमुळे महापौर निधीचे वितरण बंद झाले होते. त्यामुळे शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब समोर आल्यानंतर महापौर लांडगे यांनी पुढाकार घेत पिंपरी-चिंचवड सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केली.

या ट्रस्टचे अध्यक्ष महापौर असून उपमहापौर उपाध्यक्ष, सहआयुक्त सचिव, मुख्य लेखापाल खजिनदार म्हणून काम पाहणार आहेत. याशिवाय स्थायी समितीचे अध्यक्ष, विधी समितीचे सभापती, सत्तारूढ पक्षनेते, मुख्य लेखा परीक्षक तसेच क्रीडा विभागाचे उपायुक्त यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

### चिंचवडमध्ये उभारणार 'अजितसृष्टी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करणारी भव्य 'अजितसृष्टी' उभारण्यात येणार असल्याची घोषणा महापौर रवी लांडगे यांनी केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या संकल्पनेनुसार हे स्मृतीस्थळ साकारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर पदाचा महिनाभराचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर तसेच जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. महापौर लांडगे म्हणाले की, 'अजितसृष्टी' उभारण्याबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी लवकरच बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरात केलेल्या विविध विकासकामांचे दर्शन घडविले जाईल. तसेच महापालिकेच्या सभागृहात अजित पवार

## 'वनतारा' प्रकल्पात मिळणार नवे घर

# जुन्नरमधून 20 बिबट्यांचे गुजरातला स्थलांतर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर :** जुन्नर वनविभागाच्या हद्दीत गेल्या काही वर्षांत वाढत चाललेला मानव-बिबट संघर्ष, तसेच माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रातील वाढती संख्या लक्षात घेता वनविभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जुन्नर तालुक्यातील माणिकडोह बिबट निवारण केंद्रातून २० बिबट्यांचे पहिले स्थलांतर शनिवारी (७ मार्च २०२६) गुजरातमधील जामनगर येथे असलेल्या 'ग्रीन्स झुलॉजिकल रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन सेंटर' अर्थात 'वनतारा' प्रकल्पात यशस्वीरित्या करण्यात आले. या उपक्रमामुळे माणिकडोह केंद्रावरील ताण कमी होण्यास मदत होणार असून बिबट्यांना अधिक विस्तृत आणि सुरक्षित अधिवास उपलब्ध होणार आहे.

जुन्नर आणि शिरूर तालुक्यात गेल्या दशकभरात बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ऊस शेतीचे वाढते क्षेत्र, मानवी वस्तीचा विस्तार आणि नैसर्गिक अधिवासातील बदल यामुळे बिबटे मानवी वस्तीजवळ येण्याच्या घटना वाढल्या आहेत. परिणामी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून अनेकदा मानव-बिबट संघर्षाच्या घटना घडत आहेत. अशा घटनांमध्ये पकडण्यात आलेल्या बिबट्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांना माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात आणले जाते.

मात्र माणिकडोह येथील या केंद्राची अधिकृत क्षमता केवळ ५० बिबट्यांची आहे. गेल्या काही वर्षांत पकडण्यात आलेल्या बिबट्यांची संख्या वाढल्याने या केंद्रावर मोठा ताण निर्माण झाला होता. केंद्रातील बिबट्यांची संख्या क्षमतेपेक्षा अधिक झाल्याने त्यांच्या आरोग्य, हालचाल आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे अतिरिक्त बिबट्यांचे सुरक्षित आणि योग्य ठिकाणी स्थलांतर करण्याची गरज वनविभागासमोर निर्माण झाली होती.

यासाठी वनविभागाने एक सविस्तर प्रस्ताव तयार करून 'केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणा'कडे (Central Zoo Authority – CZA) पाठवला होता. या प्रस्तावानुसार एकूण ५० बिबट्यांचे टप्प्याटप्प्याने स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रस्तावाला २० डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत मंजुरी मिळाली. त्यानंतर स्थलांतराची प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने सुरू करण्यात आली.

या स्थलांतर प्रक्रियेसाठी गुजरातमधील जामनगर येथून २५ सदस्यीय तज्ज्ञांचे पथक ६ मार्च रोजी जुन्नर येथे दाखल झाले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने बिबट्यांची वैद्यकीय तपासणी, आरोग्य स्थिती आणि स्थलांतरासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची तपासणी केली. त्यानंतर शनिवारी पहिल्या टप्प्यात २० बिबट्यांचे (१० नर आणि १० मादी) स्थलांतर करण्यात आले.

## लोकवस्तीत बार सुरू करण्याचा प्रयत्न स्थानिकचा तीव्र विरोध



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या खंडोबामाळ परिसरात खंडोबा मंदिराच्या शेजारी बार सुरू करण्याचा प्रयत्न होत असल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या बारला देण्यात आलेली व्यावसायिक परवानगी रद्द करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

यासंदर्भात स्थानिकांनी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा गोरे तसेच चाकण पोलिस ठाण्यात निवेदन देत बार सुरू करण्यास आक्षेप नोंदवला. खंडोबा मंदिराशेजारी आणि दाट लोकवस्तीमध्ये बार सुरू झाल्यास परिसरातील सामाजिक वातावरण बिघडण्याची शक्यता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, संबंधित बारचे उद्घाटन होणार असल्याची माहिती स्थानिकांना मिळताच त्यांनी नगराध्यक्षा मनीषा गोरे यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर नगराध्यक्षा गोरे यांनी तात्काळ हस्तक्षेप करत सदर उद्घाटन थांबवले तसेच आवश्यक परवानग्या पूर्ण न करता बार सुरू करू नये, अशी सूचना संबंधित मालकांना दिली.

तथापि, संबंधित बार चालकांची मोठी राजकीय तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. दांडगाईच्या जोरावर बार सुरू करण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## वाघदरा पाझर तलाव खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाला प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथे एरमंड इंडिया प्रा. लि. कंपनी व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाघदरा पाझर तलावाच्या खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. सरपंच सारिका हिंगे व उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

सदर काम पूर्ण झाल्यानंतर अवसरी बुद्रुक तसेच परिसरातील शेतीला मोठा फायदा होणार असून सुमारे ५०० ते ६०० एकर क्षेत्र बागायतीखाली येण्यास मदत होईल, अशी माहिती उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांनी दिली.

अवसरी बुद्रुक गावाच्या दक्षिणेला असलेला वाघदरा पाझर तलाव १९७२ च्या दुष्काळाच्या काळात रोजगार हमी योजनेतून उभारण्यात आला होता. काही वर्षांपूर्वी माजी जिल्हा परिषद सदस्य रेवती वाडेकर यांच्या प्रयत्नांतून या तलावाच्या खोलीकरणासाठी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. मात्र त्यानंतर तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पावसाळ्यात पाणी साठवण क्षमतेवर परिणाम झाला होता.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सरपंच सारिका हिंगे व उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांनी नाम फाउंडेशन तसेच एरमंड इंडिया कंपनीकडे तलावाच्या खोलीकरण व रुंदीकरणासाठी पाठपुरावा केला होता.

सध्या चार पोकलेन मशिन्सच्या सहाय्याने तलावातील गाळ उपसण्याचे काम सुरू करण्यात आले असून कंपनीचे अधिकारी व कर्मचारीही प्रत्यक्ष कामावर देखरेख करत आहेत. या शुभारंभ कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे पाटील, चंद्रकांत गुनगे, चित्रा चवरे, गीता टाव्हरे, सर्जेराव हिंगे पाटील, चंद्रकांत हिंगे आदी उपस्थित होते. काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील शेतीला पाणीपुरवठा होऊन शेकडो एकर क्षेत्र बागायतीखाली येऊ शकेल.

## गुन्ह्यांच्या तपासाला मिळणार वैज्ञानिक बळ

### खेडला मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चाकण :** गुन्ह्यांच्या तपास प्रक्रियेला अधिक गतिमान आणि वैज्ञानिक आधार मिळावा यासाठी खेड तालुक्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ अंतर्गत तपास यंत्रणेला अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

न्यायवैज्ञानिक प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी न्यायवैज्ञानिक प्रक्रिया संचालनालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला टप्प्याटप्प्याने मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्याची योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार खेड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला ही अत्याधुनिक व्हॅन प्राप्त झाली आहे.

सदर व्हॅन उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहणार असून इतर व्हॅन्स उपलब्ध होईपर्यंत संपूर्ण उपविभागीय हद्दीत तिची सेवा दिली जाणार आहे.

या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमध्ये विविध फॉरेन्सिक किट्स, रसायने, आधुनिक तांत्रिक उपकरणे तसेच आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे गुन्हेगारी घटनास्थळी तात्काळ पोहोचून वैज्ञानिक पद्धतीने पुरावे संकलित करणे शक्य होणार आहे.

खेड तालुक्यात खून, खुनाचा प्रयत्न, दरोड्याचा प्रयत्न, गंभीर दुखापत, बलात्कार, आत्महत्येस प्रवृत्त करणे, जबरी चोरी, घरफोडी, पोस्को, हुंडाबळी तसेच अंमली पदार्थविरोधी कारवाया यांसारखे गुन्हे घडत असतात. अशा प्रकरणांमध्ये घटनास्थळावरील पुरावे गोळा करताना पोलिसांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र अत्याधुनिक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध झाल्याने आता घटनास्थळीच भौतिक, रासायनिक, जैविक आणि डिजिटल पुरावे त्वरित संकलित करता येणार आहेत. त्यामुळे तपास अधिक अचूक आणि प्रभावी होण्यास मदत होईल.

## सोशल मीडियाचा अतिवापर घातक सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील खामुंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय व्यवस्थापन समितीच्या पुढाकारातून शुक्रवारी (दि. ६) विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या वापराबाबत मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना थाटे म्हणाले की, सोशल मीडियाचा अतिवापर शालेय विद्यार्थ्यांसाठी घातक ठरू शकतो. मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवणे आवश्यक असून विशेषतः इन्स्टाग्रामसारख्या माध्यमांवर जास्त वेळ घालवणे टाळावे. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करून चुकीच्या मार्गाला प्रवृत्त करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. मनीषा गाडेकर, अनिता तितर, विशाल घुले आणि सूरज शिरसाठ यांच्या सहकार्याने आयोजित या आरोग्य शिबिरात शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमास श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संदीप गंभीर, रामभाऊ भोर, मंगेश शिंगोटे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य जितेंद्र रोकडे, कैलास बोडके, नितेश रोकडे, गणेश सोनवणे, नवनाथ शिंगोटे, सुहास नलावडे तसेच शिक्षक सविता हिरे, दीपाली डुंबरे, शोभा खर्गे, सुखदेव पथवे, संजय आहेर, सुवर्णा नांगरे आणि सुनीता वर्पे आदी उपस्थित होते. दरम्यान, विद्यार्थ्यांना दिलेल्या या मार्गदर्शनामुळे 'मोबाईल विरहित शाळा' संकल्पनेला चालना मिळेल.

## मालमत्ताकर जप्ती मोहीम सुरू


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच्या करसंकलन विभागामार्फत मालमत्ताकर वसुलीसाठी शहरभर जप्ती मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरातील १८ विभागीय कार्यालयांमार्फत करण्यात आलेल्या कारवाईत आतापर्यंत ८० आस्थापना व सदनिका जप्त करण्यात आल्या आहेत.

करसंकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी सर्व सहायक मंडल अधिकाऱ्यांना थकबाकीदारांवर कोणतीही सूट न देता कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

महापालिकेच्या माहितीनुसार शहरातील सुमारे सव्वापाच लाखांहून अधिक नागरिकांनी आतापर्यंत ७२४ कोटी ६१ लाख रुपये मालमत्ताकराचा भरणा केला आहे.

## 'वाचू अनुवादे' या विशेषांकाचे प्रकाशन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** अनुवाद हा विविध भाषांमधील दुवा असून त्यातून भाषा, परंपरा आणि संस्कृती यांच्यात सुसंवाद निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी इतर भाषांमधून मराठीत अनुवादित झालेले दर्जेदार साहित्य वाचून स्वतःला समृद्ध करावे, असे आवाहन देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'वाचू अनुवादे' या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. दिलीप मुळूक आणि डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.

यावेळी बोलताना अॅड. बुट्टे पाटील म्हणाले की, अनुवादित साहित्यामुळे जागतिक आणि भारतीय भाषांमधील साहित्याची ओळख होते. वैविध्यपूर्ण आणि सकस साहित्याचे वाचन मनाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असून वाचनाचा आपल्या जीवनाशी संबंध जोडला तर आयुष्य अधिक समृद्ध आणि समाधानकारक होऊ शकते.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात वाचनासाठी वेळ काढावा, असे त्यांनी सांगितले.उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा आणि त्यांना वैविध्यपूर्ण वाचनाची सवय लागावी यासाठी पालक व शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी 'वाचू अनुवादे' या विशेषांकाच्या निर्मितीमागील उद्देश स्पष्ट केला. देश-विदेशातील विविध भाषांतील दर्जेदार साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे या हेतूने हा विशेषांक प्रकाशित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या विशेषांकामध्ये इकिगाई, डिसेप्शन पॉईंट, तोत्तोचान, तीन हजार टाके, हू मूव्हड माय चीज, विंग्स ऑफ फायर, पिंजर, द पॉवर ऑफ नाऊ आणि एका कोळीयाने आदी अनुवादित पुस्तकांचा परिचय करून देणारे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. पार्थ खाडीलकर यांनी मानले.

## 'ज्ञानोबा ते तुकाराम' या राष्ट्रीय परिषदेत केलेल्या विधानाचे पडसाद

# स्वामी गोविंददेवगिरी यांच्या विधानाचा निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित 'ज्ञानोबा ते तुकाराम' या राष्ट्रीय परिषदेत आचार्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी केलेल्या विधानाचा श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी यांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या ग्रंथांविषयी केलेल्या कथित विधानांमुळे धार्मिक व सामाजिक वर्तुळात नाराजी व्यक्त होत आहे.

तसेच, संस्कृत गीतेमागील प्राकृत मराठी शब्द वाचल्यास गीतेचा खरा अर्थ उलगडतो, असे संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत नमूद केले आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी हा केवळ भाष्य नसून स्वतंत्र आणि प्रगल्भ ग्रंथरचना असल्याचे संस्थानने स्पष्ट केले. स्वामी गोविंददेव गिरी यांनी केलेल्या विधानाशी संस्थान कमिटी असहमत असून त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात येत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. संबंधितांनी संत परंपरेचा आदर राखत आपले वक्तव्य मागे घ्यावे व संतांची क्षमा मागावी, अशी मागणी संस्थानने केली आहे.

या निवेदनावर आळंदी देवस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त अॅड. राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ गुरुशांतिनाथ, चैतन्य केशवराव लोंढे, अॅड. रोहिणी पवार आणि पुरुषोत्तम पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

आचार्य गोविंददेव गिरी महाराज (उर्फ आचार्य किशोरजी व्यास) यांनी माउली मंदिरात श्रींचे दर्शन घेत मंदिराची प्रदक्षिणा केली. सुवर्णपिंपळ प्रांगणाच्या मागील बाजूस मंदिरातून बाहेर पडताना त्यांनी साष्टांग दंडवत घातला व मंदिराच्या कळसाचे दर्शन घेतले.

### गोविंददेवगिरी महाराजांची दिलगिरी

● संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेतल्यानंतर गोविंददेवगिरी महाराज यांनी आपले वक्तव्य मागे घेत असल्याचे सांगितले. कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करून माफी मागत असल्याचे त्यांनी जाहीर केले. आळंदीचे पावित्र्य जपण्यासाठी वेळ आल्यास निस्वार्थी सेवा करू, असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या या भूमिकेमुळे वातावरण काहीसे शांत झाले.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त मयुरेश्वर मंदिरात महाअभिषेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथे संकष्टी चतुर्थी तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मयूर गणेश मंडळाच्या वतीने मयुरेश्वर मंदिरात महाअभिषेक, पूजा व आरतीचा धार्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या वेळी शिवजयंतीनिमित्त मयूर गणेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हरिदास रामवत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या धार्मिक कार्यक्रमात पुरोहित महेश चिंचोलीकर यांनी मंत्रोच्चारात महाअभिषेक विधी पार पाडला. त्यानंतर उपस्थित भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले. सायंकाळी सात ते नऊ या वेळेत संगीत भजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष मनोज काळदंते यांनी दिली.

यावेळी आरतीचे मानकरी म्हणून हरिदास रामवत, चंद्रकांत शिंदे, शामराव शिंदे, महादेव गावडे, सुरज रामवत, आशिष शिंदे तसेच मंडळाचे अध्यक्ष मनोज काळदंते, बाळासाहेब गायकवाड, शैलेश भालेराव, शांताराम भालेराव, दीपक टेंभेकर, रावजी बांगर आदी मान्यवर उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### सुंदर पिचाईंचा पगार गगनाला

**वॉशिंग्टन :** गुगलची पालक कंपनी अल्फाबेटने गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांचे नवे पे पॅकेज जाहीर केले असून पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा संभाव्य पगार तब्बल ६९२ दशलक्ष डॉलर्स (सुमारे ६ हजार कोटी रुपये) इतका ठरला आहे. फायनान्शियल टाईम्सच्या वृत्तानुसार, या पॅकेजमुळे मायक्रोसॉफ्टचे सत्या नडेला आणि ॲपलचे टिम कुक यांच्यापेक्षा पिचाई खूप पुढे गेले आहेत. पिचाई आणि त्यांच्या पत्नीकडे सध्या गुगलचे सुमारे १६.७ लाख शेअर्स असून त्यांची किंमत जवळपास ४९८ दशलक्ष डॉलर्स आहे. त्यांच्या पगारातील मोठा भाग 'परफॉर्मन्स स्टॉक युनिट्स' स्वरूपात असून कंपनीच्या शेअरची कामगिरी चांगली राहिल्यास त्याची किंमत दुप्पट होण्याची शक्यता आहे.

### आखाती देशात तणाव सेन्सेक्स १,०९७ अंकांनी कोसळला

**नवी दिल्ली :** आखाती देशांमधील संघर्ष सातव्या दिवशीही कायम राहिल्याने आणि खनिज तेलाच्या वाढत्या किमतींच्या चिंतेमुळे भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी तीव्र घसरण झाली. प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स १,०९७ अंकांनी (१.३७ टक्के) घसरून ७८,९१८.९० वर बंद झाला, तर निफ्टी ३१५.४५ अंकांनी घसरून २४,४५०.४५ पातळीवर स्थिरावला. अमेरिकन व युरोपीय बाजारातील कमजोरी, तसेच परदेशी गुंतवणूकदारांचे सतत सुरू असलेले निर्गमन यामुळे गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतली. अमेरिका-इराण तणावामुळे तेल-गॅस पुरवठा विस्कळीत होण्याची भीती असून वाढत्या इंधन किमतींमुळे महागाई आणि अर्थव्यवस्थेवर दबाव वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### फ्लिपकार्टकडून ३०० कर्मचाऱ्यांची कपात

**नवी दिल्ली :** फ्लिपकार्ट या ई-कॉमर्स कंपनीने वार्षिक कामगिरी आढाव्यानंतर सुमारे ३०० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. ६-७ मार्च रोजी झालेल्या परफॉर्मन्स रिव्ह्यूनंतर हा निर्णय घेण्यात आला. कंपनीच्या एकूण सुमारे २० हजार कर्मचाऱ्यांपैकी अंदाजे १.५ टक्के कर्मचाऱ्यांवर या कपातीचा परिणाम झाला असून अभियांत्रिकी, ऑपरेशन्स आणि मार्केटिंग विभागातील कर्मचारी प्रभावित झाले आहेत. यापूर्वी २०२४ च्या सुरुवातीला कंपनीने सुमारे १,००० कर्मचाऱ्यांना कमी केले होते. दरम्यान, Walmartच्या मालकीची फ्लिपकार्ट भारतातील संभाव्य आयपीओसाठी तयारी करत असून खर्च नियंत्रण व कार्यक्षमता वाढवण्यावर कंपनीचा भर असल्याचे समजते.

## उद्योगपती खलफ अहमद अल हब्तूर यांचे डोनाल्ड ट्रम्प यांना पत्र

# "आम्हाला युद्धात ओढण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?"

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अबू धाबी :** अमेरिका–इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त अरब अमिरातीतील (यूएई) अब्जाधीश उद्योगपती खलफ अहमद अल हब्तूर यांनी अमेरिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना उद्देशून त्यांनी एक खुले पत्र लिहित आखाती देशांना या संघर्षात ओढण्याच्या अधिकारावर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पश्चिम आशियातील तणाव सध्या गंभीर पातळीवर पोहोचला आहे.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर परिस्थिती आणखी चिघळली असून इराणने अमेरिका आणि इस्रायलविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर इराणने यूएईमधील दुबई आणि अबू धाबी यांसह काही शहरांवर हवाई हल्ले केल्याचे वृत्त समोर आले. त्यामुळे आखाती प्रदेशात अस्वस्थता वाढली असून या संघर्षाचे पडसाद संपूर्ण मध्यपूर्वेत उमटत आहेत. या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना यूएईतील प्रसिद्ध उद्योगपती खलफ अहमद अल हब्तूर यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना उद्देशून कठोर शब्दांत पत्र लिहिले आहे. "तुम्ही आखाती आणि अरब देशांना अशा धोक्याच्या केंद्रस्थानी आणून ठेवले आहे, जे त्यांनी कधीही निवडले नव्हते.

देवाचे आभार की आम्ही स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम आहोत. आमच्याकडे आमच्या मातृभूमीचे रक्षण करणारे सैन्य आणि संरक्षण व्यवस्था आहे. मात्र आम्हाला या युद्धात ओढण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?" असा थेट सवाल त्यांनी ट्रम्प यांना केला आहे. अल हब्तूर यांनी आपल्या पत्रात अमेरिकेच्या धोरणावर टीका करत सांगितले की, इराणबरोबर सुरू असलेल्या लष्करी संघर्षामुळे संपूर्ण आखाती प्रदेश अस्थिरतेच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे.

या संघर्षामुळे अनेक देशांना अनावश्यकपणे धोक्याचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, यूएई सरकारकडूनही इराणच्या कारवायांचा निषेध करण्यात आला आहे. यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांचे सल्लागार अन्वर गर्गश यांनी इराणच्या हल्ल्यांवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, "आखाती देशांविरुद्ध इराणच्या आक्रमकतेमुळे परिस्थिती अधिक बिघडली आहे. तुमचे युद्ध शेजारी राष्ट्रांशी नाही. तणाव वाढवून तुम्ही अशा लोकांच्या मतांना बळ देत आहात जे इराणला प्रादेशिक अस्थिरतेचे प्रमुख कारण मानतात."

दुसरीकडे, इराणनेही कठोर भूमिका कायम ठेवली आहे. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूचा बदला घेण्याचा इशारा दिला आहे. "सर्वोच्च नेत्यांच्या हत्येचा बदला घेणे हे इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणचे कायदेशीर कर्तव्य आणि अधिकार आहे," असे त्यांनी एका निवेदनात स्पष्ट केले. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे जागतिक पातळीवर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या संघर्षाचे परिणाम केवळ संबंधित देशांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण मध्यपूर्व आणि जागतिक राजकारणावरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत यूएईतील उद्योगपतीने अमेरिकेला थेट सवाल उपस्थित केल्याने या वादाला आणखी राजकीय आणि राजनैतिक परिमाण मिळाले आहे.

## लोकसंख्या वाढीसाठी आंध्र प्रदेश सरकारचा नवा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अमरावती :** आंध्र प्रदेशमध्ये घटत चाललेल्या जन्मदराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडूयांनी विधानसभेत बोलताना राज्यात लवकरच नवीन लोकसंख्या धोरण लागू करण्याची घोषणा केली. या धोरणांतर्गत दुसऱ्या आणि तिसऱ्या अपत्याच्या जन्मासाठी कुटुंबांना आर्थिक प्रोत्साहन देण्याची योजना सरकार राबवणार आहे.

मुख्यमंत्री नायडू यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून राज्यात जन्मदर सातत्याने घटत आहे. हीच परिस्थिती कायम राहिली तर भविष्यात राज्यातील तरुणांची संख्या कमी होऊ शकते आणि त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर व क्रयशक्तीवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकसंख्येचे संतुलन राखण्यासाठी सरकारने प्रोत्साहनपर धोरण आणण्याचा निर्णय घेतला आहे.

या नव्या योजनेनुसार दुसऱ्या आणि तिसऱ्या अपत्याच्या जन्मावेळी कुटुंबाला सरकारकडून २५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. विशेषतः तिसऱ्या अपत्यासाठी अतिरिक्त सुविधा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तिसऱ्या मुलाच्या जन्मानंतर सरकार त्या मुलाला पहिले पाच वर्ष दरमहा १,००० रुपये देणार आहे. तसेच त्या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारीही सरकार उचलणार असून १८ वर्षांपर्यंत मोफत शिक्षणाची सुविधा देण्याचा प्रस्ताव आहे.

या सर्व लाभांचा विचार केला तर तिसऱ्या अपत्यासाठी कुटुंबाला एकूण सुमारे ८५ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळू शकते. सरकारला आशा आहे की या प्रोत्साहनामुळे कुटुंबे अधिक मुलांना जन्म देण्याचा विचार करतील आणि राज्यातील घटता जन्मदर नियंत्रित होण्यास मदत होईल.

दरम्यान, राज्य सरकार मार्चअखेर या योजनेला अंतिम रूप देणार असून येत्या १ एप्रिलपासून ती संपूर्ण राज्यात लागू होण्याची शक्यता आहे.

## आसाममध्ये महिलेचा नागरिकत्वप्राप्तीचा मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी :** आसाममधील कछार जिल्ह्यात नागरिकत्व दुरुस्ती कायद्यांतर्गत (सीएए) एका महिलेला भारतीय नागरिकत्व प्रदान करण्यात आले आहे. देपाली दास (वय ५९) असे या महिलेचे नाव असून त्या कछार जिल्ह्यातील धोलाई विधानसभा मतदारसंघातील हवैथांग परिसरातील रहिवासी आहेत. विशेष म्हणजे, परदेशी लवादाने पूर्वी त्यांना बेकायदा स्थलांतरित घोषित केले होते.

फेब्रुवारी २०१९ मध्ये परदेशी न्यायाधिकरणाने देपाली दास यांना बेकायदा स्थलांतरित घोषित केले होते. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्याच वर्षी १० मे रोजी सिलचर येथील डिटेन्शन सेंटरमध्ये पाठवले. सुमारे दोन वर्षे त्या तेथे राहिल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर १७ मे २०२१ रोजी त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली, अशी माहिती त्यांचे वकील धर्मानंद देब यांनी दिली.

देपाली दास या मूळच्या बांगलादेशातील सिल्हेट जिल्ह्यातील धिराई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दीपपूर गावच्या रहिवासी आहेत. २०१३ मध्ये पोलिसांनी त्यांच्या नागरिकत्वाबाबत चौकशी सुरू केली. त्यानंतर २ जुलै २०१३ रोजी दाखल केलेल्या आरोपपत्रात देपाली दास या बांगलादेशातील बनियाचोंग येथील रहिवासी असून मार्च १९७१ नंतर त्या बेकायदेशीररीत्या भारतात आल्याचे नमूद करण्यात आले होते. वकील धर्मानंद देब यांनी सांगितले की, सीएएअंतर्गत नागरिकत्वासाठी दाखल केलेल्या अर्जात हेच आरोपपत्र महत्त्वाचा पुरावा ठरले. कारण या कायद्याअंतर्गत अर्ज करताना बांगलादेश, पाकिस्तान किंवा अफगाणिस्तान येथून स्थलांतर झाल्याचे कागदोपत्री पुरावे सादर करणे आवश्यक असते. अनेक प्रकरणांत अर्जदारांकडे असे पुरावे नसतात; मात्र २०१३ मध्ये पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात देपाली दास या बांगलादेशातील असल्याचे स्पष्ट नमूद असल्याने अधिकाऱ्यांनी तो दस्तऐवज वैध पुरावा म्हणून स्वीकारला.

## राष्ट्रवादीत नाराजी; आणखी एका प्रदेशाध्यक्षाचा राजीनामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत नाराजी आता अधिकच तीव्र होताना दिसत आहे. पक्षात सन्मान मिळत नाही आणि अपेक्षित सहकार्यही मिळत नाही, असा आरोप करत महानगरपालिका कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गौतम खरात यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत दिलेल्या या राजीनाम्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

गौतम खरात यांनी आपल्या राजीनामा पत्रात पक्षाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आपण आतापर्यंत निष्ठेने पक्षाचे काम केले, मात्र प्रदेश पातळीवरून अपेक्षित मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले नाही, असे त्यांनी नमूद केले आहे. पक्षात केवळ ठराविक व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकांनाच महत्त्व दिले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

पदे आणि सन्मानही त्याच गटापुरते मर्यादित असल्याने सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा अवमान होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाची पार्श्वभूमी २६ जानेवारी रोजी घडलेल्या घडामोडींमध्ये असल्याचे सांगितले जात आहे. सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असलेल्या काही सेलच्या प्रदेशाध्यक्षांनी त्या वेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राजीनामे सुपूर्द केले होते. मात्र अजित पवार यांनी ते राजीनामे स्वीकारण्यास नकार देत संबंधित पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी मुंबईत बोलावले होते.

त्यानंतर पक्षातील परिस्थितीत मोठे बदल झाले. अजित पवार यांच्या निधनानंतर आणि त्यापूर्वी झालेल्या अपघातानंतर पक्षातील समीकरणे बदलली. अजित पवार सक्रिय असताना त्यांनी हे राजीनामे फेटाळले होते, मात्र त्यांच्या पश्चात अवघ्या दीड महिन्यातच संबंधित पदाधिकाऱ्यांना पक्षातून बाहेरचा मार्ग स्वीकारावा लागला असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजीनाम्यांची ही मालिका केवळ एका पदाधिकाऱ्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. गौतम खरात यांच्याआधी राष्ट्रवादी मोटर मालक वाहतूक सेलचे सचिन जाधव, उद्योग विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुभाष मालवणी आणि असंघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे यांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

## भाजपाचे ज्येष्ठ आमदार गोविंद परमार यांचे हृदयविकाराने निधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरातमधील सत्ताधारी भाजपाचे ज्येष्ठ आमदार गोविंद परमार यांचे शुक्रवारी (६ मार्च) पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या अचानक निधनामुळे गुजरातच्या राजकीय वर्तुळात शोककळा पसरली असून अनेक नेत्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र



पटेल यांनीही परमार यांच्या निधनावर दुःख व्यक्त करत पक्षाने जनसामान्यांशी नाळ जोडलेला एक जिव्हाळ्याचा नेता गमावल्याची भावना व्यक्त केली.

गोविंद परमार हे आणंद जिल्ह्यातील उमरेठ विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत होते. शुक्रवारी पहाटे अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने कुटुंबीयांनी त्यांना तातडीने एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्यामुळे भाजपाबरोबरच आणंद जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. क्षत्रिय-ठाकोर समाजातील प्रभावशाली नेते म्हणून त्यांची ओळख होती. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून त्यांनी तळागाळातील लोकांशी घट्ट नाते निर्माण केले होते.

परमार यांचा राजकीय प्रवासही उल्लेखनीय राहिला. १९९५ मध्ये त्यांनी सारसा विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवून विजय मिळवला आणि पहिल्यांदा गुजरात विधानसभेत प्रवेश केला. गोविंद परमार यांच्या निधनामुळे गुजरात भाजपाने एक अनुभवी नेता गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

## हिंद महासागरात अमेरिकेचा हल्ला

# इराणच्या युद्धनौकेला भारताचा मानवतावादी आधार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील तणावपूर्ण युद्ध परिस्थिती अद्याप कायम असून या पार्श्वभूमीवर हिंद महासागरात घडलेल्या एका मोठ्या लष्करी घटनेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खळबळ उडाली आहे. अमेरिकेने श्रीलंकेच्या किनारपट्टीजवळ इराणच्या नौदलाची 'आयआरआयएस देना' (IRIS Dena) ही युद्धनौका लक्ष्य करत हल्ला केला. या हल्ल्यात युद्धनौका पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून त्यात ८० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेदरम्यान भारताने मात्र मानवतेचा दृष्टिकोन ठेवत इराणच्या दुसऱ्या युद्धनौकेला मदत केल्याचे स्पष्ट झाले आहे. तांत्रिक बिघाडामुळे अडचणीत सापडलेल्या इराणी नौदलाच्या 'आयआरआयएस लावन' (IRIS Lavan) या युद्धनौकेला भारताने कोची बंदरात आपत्कालीन डॉकिंगची परवानगी दिली होती. या जहाजावरील सुमारे १८३ खलाशांसाठीही भारताने राहण्याची व्यवस्था केल्याची माहिती समोर आली आहे.





भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या संदर्भात भूमिका स्पष्ट करत सांगितले की, युद्धाच्या परिस्थितीतही भारताने भू-राजकीय विचार बाजूला ठेवून मानवतेच्या आधारावर निर्णय घेतला. "अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील संघर्ष सुरू असताना इराणकडून त्यांच्या जहाजाला तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याचा संदेश मिळाला होता. त्यामुळे 'आयआरआयएस लावन' या जहाजाला कोची बंदरात आश्रय देण्याचा निर्णय घेण्यात आला. कायदेशीर किंवा राजकीय मुद्दे काहीही असले तरी आम्ही मानवतेच्या दृष्टिकोनातून परिस्थितीकडे पाहिले आणि योग्य निर्णय घेतला," असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अमेरिकेच्या हल्ल्यानंतर बुडणाऱ्या 'आयआरआयएस देना' या युद्धनौकेने SOS अर्थात आपत्कालीन मदतीचा संदेश पाठवला होता. भारतीय नौदलाने हा संदेश मिळताच तातडीने शोध आणि बचाव मोहीम सुरू केली. श्रीलंकेच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मोहिमेला मदत करण्यासाठी भारतीय नौदलाने लांब पल्ल्याचे सागरी गस्त जहाज पाठवले, तसेच जवळ तैनात असलेले आयएनएस तरंगिनी जहाजही बचाव कार्यासाठी रवाना करण्यात आले.

या घटनांमुळे हिंद महासागरातील तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून जागतिक राजकारणात या घडामोडींचे दूरगामी परिणाम होऊ शकतात.

# भारताचा उदय इतरांच्या चुकांमुळे नाही; भारतच ठरवेल आपला मार्ग – जयशंकर यांचे अमेरिकेला प्रत्युत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिकेमधील बहुप्रतीक्षित व्यापार करारावर काही दिवसांपूर्वी शिक्कामोर्तब झाले असून या करारानंतर दोन्ही देशांतील आर्थिक संबंधांना नवी दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही अनेकदा या कराराबाबत भाष्य केले आहे. करारानंतर अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांऐवजी १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतल्याने व्यापार क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

मात्र, या कराराच्या संदर्भात अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी केलेल्या वक्तव्यामुळे आता नवी चर्चा सुरू झाली आहे. "भारत आणि अमेरिका व्यापार करारामध्ये अमेरिका 'अमेरिका फर्स्ट' या धोरणालाच प्राधान्य देईल. २० वर्षांपूर्वी चीनबाबत अमेरिकेकडून झालेल्या चुका आता भारताबाबत होऊ देणार नाही," असे लँडौ यांनी स्पष्टपणे म्हटले होते.

लँडौ यांच्या या वक्तव्यानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ठाम आणि स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देत अमेरिकेला अप्रत्यक्षपणे सुनावले आहे. "भारताचा जागतिक स्तरावरील उदय इतर देशांच्या चुकांमुळे होणार नाही. भारताचा उदय भारत स्वतःच्या सामर्थ्यावर आणि क्षमतेवरच करेल," असे जयशंकर यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी असेही नमूद केले की, भारताची प्रगती ही कोणाच्या धोरणात्मक चुका किंवा परिस्थितीमुळे नव्हे, तर देशाच्या आर्थिक ताकदी, लोकशक्ती आणि सातत्यपूर्ण विकासाच्या धोरणांमुळे घडत आहे. त्यामुळे भारताचा उदय कसा आणि किती वेगाने होईल हे भारतच ठरवेल, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

या सर्व घडामोडींमुळे भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत राजकीय आणि आर्थिक वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली असून दोन्ही देशांतील संबंध पुढील काळात कोणत्या दिशेने जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## इराणमध्ये ४.१ रिश्टरचा भूकंप

**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इस्रायलसोबत तणावपूर्ण परिस्थिती असताना इराणमध्ये शनिवारी सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. संयुक्त राष्ट्र जिओलॉजिकल सर्व्हेच्या माहितीनुसार, ७ मार्च रोजी रिश्टर स्केलवर ४.१ तीव्रतेचा भूकंप झाला. त्याचे केंद्र बांदर अब्बास या महत्त्वाच्या बंदर शहरापासून सुमारे ७५ किमी पश्चिमेला आणि जमिनीपासून सुमारे १० किमी खोल होते. २८ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या संघर्षानंतर इराणमध्ये आलेला हा दुसरा भूकंप आहे. यापूर्वी फार्स प्रोव्हिन्स मधील गेराश येथेही धक्के जाणवले होते.

## नेपाळमध्ये Gen-Z ची राजकीय क्रांती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काठमांडू :** नेपाळच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप घडवत तरुणाईने प्रस्थापित नेत्यांना जोरदार धक्का दिला आहे. प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या झापा-५ मतदारसंघातून राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे (आरएसपी) तरुण नेते बालेंद्र शाह यांनी माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचा तब्बल सुमारे ५० हजार मतांच्या फरकाने पराभव केला आहे. या निकालामुळे नेपाळमध्ये 'जनरेशन-झेड' पिढीच्या राजकीय उदयाची चर्चा रंगली आहे.

निवडणूक आयोगाच्या अंतिम आकडेवारीनुसार, बालेंद्र शाह यांना ६८,३४८ मते मिळाली, तर के. पी. शर्मा ओली यांना केवळ १८,७३४ मते मिळाली. त्यामुळे शाह यांनी ४९,६१४ मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवत नेपाळच्या राजकारणात मोठा उलटफेर घडवून आणला. झापा-५ हा मतदारसंघ ओली यांचा बालेकिल्ला मानला जात होता. त्यामुळे या मतदारसंघातील निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. मात्र तरुण मतदारांच्या मोठ्या पाठिंब्यामुळे बालेंद्र शाह यांनी ऐतिहासिक विजय मिळवला.

राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने (आरएसपी) या निवडणुकीत अभूतपूर्व कामगिरी करत काठमांडू खोऱ्यातील सर्व १० जागांवर विजय मिळवला आहे. काठमांडूचे माजी महापौर असलेले ३५ वर्षीय बालेंद्र शाह आता नेपाळच्या पंतप्रधानपदाचे प्रमुख दावेदार मानले जात आहेत. त्यांच्या विजयामुळे देशात नव्या राजकीय नेतृत्वाची नांदी झाल्याचे मानले जात आहे

या निवडणुकीच्या निकालानंतर नेपाळमध्ये नवीन सरकार स्थापनेची प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. तरुण नेतृत्वाच्या उदयानंतर देशाच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## डॉलर मजबूत, ट्रेझरी बाँड परताव्यात वाढ; युद्धाचे सावट असतानाही मौल्यवान धातूंवर दबाव

# जागतिक बाजारात सोने-चांदीच्या दराला ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जागतिक बाजारात सातत्याने नवे उच्चांक गाठणाऱ्या सोने-चांदीच्या दरांना अखेर ब्रेक लागला असून आठवडाभरात या मौल्यवान धातूंच्या किमतीत लक्षणीय घसरण झाल्याचे दिसून आले आहे. अमेरिका-इराण-इस्रायल संघर्ष सुरू असतानाही गुंतवणूकदारांनी सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोने-चांदीऐवजी डॉलर आणि ट्रेझरी बाँड्सकडे कल दर्शवल्याने दरांवर दबाव वाढला आहे.

शनिवारी जागतिक बाजारात सोन्याचा भाव प्रति औंस सुमारे ५,१३० डॉलर्सपर्यंत खाली आला. त्याचवेळी चांदीच्या किमतीतही घसरण झाली. युद्धजन्य परिस्थितीत साधारणतः सोन्याची मागणी वाढते; मात्र यावेळी अमेरिकन डॉलरला मिळालेली बळकटी आणि ट्रेझरी बाँड्सच्या वाढत्या परताव्यामुळे मौल्यवान धातूंच्या किमतीवर दबाव निर्माण झाल्याचे सराफा बाजारातील तज्ज्ञांनी सांगितले.

याचबरोबर इतर धातूंच्याही किमती घसरल्याचे दिसून आले. शुक्रवारी जागतिक बाजारात तांब्याच्या किमतीत तब्बल १.७७ टक्क्यांची घसरण होत त्या ५.८० डॉलर्सपर्यंत खाली आल्या. तर प्लॅटिनमचा दर ०.१९ टक्क्यांनी कमी होऊन २,१४९.९० डॉलर्सवर स्थिरावला. अर्थतज्ज्ञांच्या मते, अमेरिकन डॉलर इंडेक्स ०.३५ टक्क्यांनी वाढून ९९.१० वर पोहोचल्याने सोन्याच्या दरावर मोठा परिणाम झाला.

सामान्यतः डॉलर इंडेक्समध्ये ०.१ टक्क्यांची वाढ झाल्यास सोन्याच्या दरात प्रति औंस ८ ते १२ डॉलर्सची घसरण होते.




दरम्यान, अमेरिकेच्या १० वर्षांच्या ट्रेझरी बाँड्सचा परतावा वाढून ४.११ टक्क्यांवर पोहोचल्याने अनेक गुंतवणूकदारांनी सोने-चांदीची विक्री करून बाँड्समध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे सोन्याच्या दरात प्रति औंस २८ ते ४२ डॉलर्सपर्यंत घसरण झाल्याचे निरीक्षण नोंदवले गेले. काही वृत्तांनुसार इराणकडून चर्चेचे संकेत मिळत असल्याच्या चर्चेमुळे युद्धाचा तणाव कमी होईल, अशी अपेक्षाही गुंतवणूकदारांनी व्यक्त केली.

याशिवाय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांचाही कमोडिटी बाजारावर परिणाम झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने काही टॅरिफ धोरणे रद्द ठरवल्यानंतर अमेरिकेने जागतिक आयातीवर १५ टक्के तात्पुरता टॅरिफ लागू करण्याची योजना जाहीर केली. या बदलांमुळे जागतिक व्यापारात अनिश्चितता निर्माण झाली असून त्याचा परिणाम धातूंच्या किमतींवर होत असल्याचे सांगितले जाते.

तज्ज्ञांच्या मते, सध्याची घसरण तात्पुरती असू शकते आणि दीर्घकालीन कल अजूनही सकारात्मक आहे. जगभरातील मध्यवर्ती बँका मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी करत असल्याने भविष्यात पुन्हा दर वाढण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील संघर्ष तीव्र झाल्यास सोन्याची मागणी वाढू शकते; मात्र तणाव कमी झाला किंवा अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदर कपातीस विलंब केला तर डॉलर मजबूत राहून सोने-चांदीच्या किमतीवर दबाव कायम राहू शकतो.

दरम्यान, महाराष्ट्रातील जळगावच्या सुवर्ण बाजारात शनिवारी सोन्याच्या दरात प्रति तोळा २,१६३ रुपयांची वाढ झाली असून दर १० ग्रॅमसाठी जीएसटीसह सुमारे १ लाख ६६ हजार १३९ रुपयांवर पोहोचले. चांदीच्या दरातही ४,१२० रुपयांची वाढ होऊन प्रति किलो भाव सुमारे २ लाख ७८ हजार १०० रुपयांपर्यंत गेला आहे. त्यामुळे जागतिक घसरणीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक बाजारात चढ-उतार सुरू असल्याचे दिसून येत आहे.